# जपानी भाषा वक्तृत्व स्पर्धेत कनका पेडणेकर प्रथम

जपानी भाषा वक्तृत्व स्पर्धेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कनका पेडणेकर यांचा प्रथम क्रमांक

मोंबुशो स्कॉलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (मोसाई ) तर्फे आयोजित ३६व्या जपानी भाषेच्या वक्तृत्व स्पर्धेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या जपानी विभागात बी ए जपानी भाषेच्या द्वितीय वर्षात शिकणाऱ्या कुमारी कनका देवेंद्र पेडणेकर हिने पश्चिम विभागातून वरिष्ठ गटात प्रथम पारितोषिक मिळवले. हे बक्षीस तिला विभागून मिळाले आहे. पश्चिम विभागाची स्पर्धा जलताप पुणे, निहोनजिनकाई आणि कॉनस्युलेट जनरल ऑफ जपान, मुंबई तर्फे आयोजित करण्यात आली. पारितोषिकाचे स्वरूप ट्रॉफी व रोख रक्कम असे होते. हे पारितोषिक टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या जपानी भाषा विभागासाठी अभिमानाचा क्षण आहे. विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक आणि कुलगुरू डॉ. गीताली टिळक यांनी जपानी भाषा विभाग व कनका पेडणेकर यांचे अभिनंदन केले.

